# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०७.०८.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**गुन्हेशाखा, युनिट ०४ पोलीसांची कामगिरी :— सोनसाखळी चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०५.०८.२०२६ चे १२.३० चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीत शिला रेसीडेन्सी, फ्लॅट नं. ३०१, भगवान नगर येथे राहणारे फिर्यादी सदानंद महादेव कांबळे वय ६३ वर्षे, हे घरी असतांना अज्ञात ईसमाने येवून मुलाचे पार्सल आले आहे असे म्हटल्याने फिर्यादीने मुलाला विचारले असता, त्याने पार्सल मागविले नाही असे सांगितले. फिर्यादी पार्सलवरील पत्ता वाचत असतांना पार्सल आणलेल्या अज्ञात आरोपीने फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन वजनी १० ग्राम जबरीने हिसकावुन घेवुन पळुन गेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अजनी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०४(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा युनिट ०४ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपीस निष्पन्न केले. व सापळा रचुन आरोपी नामे युवराज सुनिल गुप्ता वय १८ वर्षे, रा. प्लॉट नं. ४६, रफीक टेलरचे घराजवळ, रेणूकानगर, पारडी, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन सोन्याची चैन व ०१ मोबाईल फोन असा एकुण १,५०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव अजनी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे पोनि. बाबूराव राऊत, सपोनि. वैभव बारंगे, पोहवा निलेश ढोणे, अभिषेक शनिवारे, पुरूषोत्तम जगनाडे, अजय यादव, पुरूषोत्तम काळमेघ, लक्ष्मण कळमकर, गोविंद देशमुख, ओमकार बाराभाई, नरेश व मनिष यांनी केली.



**२) पोलीस ठाणे नंदनवन :— फसवणूक करणारे गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत दिनांक १७.०६.२०२६ रोजी फिर्यादी नामे निखील आकाश चौव्हाण वय ४० वर्ष रा. प्लाट नं. १६, वागी, यवतमाळ यांचेकडुन आरोपीं १) परवेज अहेमद मो. शरीफ पटेल वय ५० वर्ष राहणार हसन बाग पोलीस चौकी २) अवतार सिंग जग्गू सिंग जुनी वय ५० वर्ष राहणार चंकापूर, गोवर्धन चौक, चंद्रपूर ३) शाहरुख खान मतलब खान वय ३१ वर्ष राहणार शालिकराम नगर, वार्ड नंबर ४, घुगुस, जिल्हा चंद्रपूर ४) अंकित लीलाधर वासनिक वय ३० वर्ष राहणार तामसवाडी, तुमसर, भंडारा, ह.मु. हसनबाग नागपूर ५) अंकित राजेंद्र सूर्यवंशी वय ३५ वर्ष राहणार बैतुल, प्लॉट नंबर ९३, टिकारी, कोतवाली ठाणा चे मागे बैतुल, मध्य प्रदेश हल्ली मुक्काम परवेज पटेल चे घरी किरायाने ६) मोहम्मद मन्नन मोहम्मद इद्रीस शेख व ३१ वर्ष राहणार अशफाक खान प्लॉटवाले, खरबी, नागपूर ७) अदनान उर्फ आशु रोशन खान वय ३५ वर्ष राहणार हसनबाग, नंदनवन, नागपूर यांनी संगणमत करून चारपट पैसे देण्याचे आमीष दाखवून फिर्यादी कडुन ५००००/—रू. रोख स्वीकारून पैश्याचा अपहार करून नोटाचे कागदी बंडल दाखवून दिशाभुल व फसवणूक केली होती. नंदनवन पोलीसांनी सापळा रचून कारवाई केली. फिर्यादीसोबत आरोपींना देण्यासाठी ठेवण्यात आलेली ५००/— दर्शनी मूल्याच्या २०० नोटांची एकूण ४००००/— रक्कम पंचासमक्ष तयार ठेवण्यात आली होती. सदर नोटांच्या बंडलवरील नोटांचे क्रमांक नोंदविण्यात आले होते. तपासादरम्यान आरोपींकडून फिर्यादीशी संपर्क साधण्यासाठी मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. पोलीस पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई करून संबंधित आरोपींना ताब्यात घेतले असून, त्यांच्याकडून गुन्ह्याच्या अनुषंगाने आवश्यक पुरावे व साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलीस ठाणे नंदनवन येथे अप.क्र. २५६/२०२६ कलम ३१६(३), ३१८(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात वरिल ०७ आरोपींना अटक करण्यात आली असून ते सध्या नागपूर कारागृहात आहेत. आरोपी नामे नरेश बुचके रा. बेलखेडा जिंतुर परभणी व पुणेवाला पाटील रा. हिंगोली हा फरार असून यांचा शोध सुरू आहे.

गुन्ह्यातील आरोपींचा टोळी प्रमुख परवेज अहेमद मो. शरीफ पटेल वय ५० वर्ष राहणार हसन बाग पोलीस चौकी समोर नंदनवन नागपूर याने त्याचे इतर साथीदारांचे मदतीने वरील संघटीत गुन्हा केलेला असून सदर टोळी प्रमुख व त्याचे नमुद साथीदारांविरूध्द खुन, खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी, शिवीगाळ मारपीट करणे, फसवणूक करणे, बेकादेशीर अग्नी शस्त्र बाळगणे, बनावट दस्तावेज तयार करणे असे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर टोळी मधील आरोपीतां विरूध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करून सुध्दा त्यांनी त्यांची गुन्हेगारी कृत्य सुरूच ठेवले होते. करिता सदर टोळी विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९(मकोका) अन्वये कारवाई करणेबाबत मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री विश्वास नांगरे पाटील यांनी आदेश दिले होते. त्याअनुषंगाने श्रीमती रश्मिता राव एन. (भा.पो.से.) पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्र.४, नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनात पोलीस ठाणे नंदनवनचे व.पो.नि श्री कैलास देशमाने, पोउपनि प्रदीप काईट व त्यांचे पथकाने नमुद आरोपीतांविरूध्द मकोका अंतर्गत कलम वाढ करणेबाबत चा प्रस्ताव स.पो.आ. श्री रोशन पंडीत, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांचे मार्फत मा. अपर पोलीस आयुक्त, श्री वसंत परदेशी, (द.प्रा.वि.) नागपूर शहर यांना सादर केला होता.

आज दिनांक ०७.०८.२०२६ रोजी नमुद गुन्हयात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ अन्वये कलम ३(१)(ii),३(२),३(४) मकोका कायद्याची कलमे समाविष्ट करण्याची परवानगी दिल्याने सदर गुन्ह्यामध्ये मकोका कायद्याची कलमे समाविष्ट करण्यात आली आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास स.पो.आ. श्री रोशन पंडीत, सक्करदरा विभाग, नागपूर शहर हे करीत आहेत.

संघटित गुन्हेगारी व दहशत निर्माण करणाऱ्या समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची भूमिका नागपूर शहर पोलिसांनी कायम ठेवली असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांची माहिती तात्काळ पोलीसांना द्यावी.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे वाठोडा :— जिवे ठार मारणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक ०६.०८.२०२६ चे १९.०० वा. ते ०७.०८.२०२६ चे १२.१० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाठोडा हद्दीत सिम्बॉयसीस कॉलेज मागील मोकळ्या जागेमध्ये फिर्यादीचा लहान भाऊ प्रतिक उर्फ आदी राजू करंडेकर वय २० वर्ष रा. प्लॉट नं. २५, गंगाबाग, दुर्गा चौक, नकुल कॅटर्सजवळ पारडी, नागपूर यास कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरून दगडाने डोक्यावर मारून जिवानीशी ठार केले. याप्रकरणी फिर्यादी अपेक्षीत राजू करंडेकर वय २२ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाठोडा येथे मपोउपनि पुजा शेळके यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम १०३(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला.

वाठोडा पोलीसांनी गुन्ह्याचे तपासात त्वरीत दखल घेवून घटनास्थळी व आजूबाजूला विचारपूस करून आरोपी विषयी माहिती काढून आरोपींना निष्पन्न केले. व सापळा रचून पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतून आरोपी क्र. १) आवेज ईकबाल शेख वय १९ वर्षे, रा. प्लॉट नं. ३०३, देशपांडे ले—आऊट, गौसीया मस्जीद जवळ, नागपूर २) शाकीब शेख अब्दुल कलाम वय २६ वर्षे, रा. आर.एस. किराणा जवळ, जयभीम चौक, हिवरीनगर, नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपूस केली असता, आरोपी क्र. १ याने मृतकासोबत गाडीचा कट लागल्याचे जुन्या वादाचे कारणावरून त्यास संगणमताने जिवानीशी ठार केल्याचे कबूल केले. आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे वाडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.०८.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक ०६.०८.२०२६ चे १६.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे वाडी हद्दीत प्लॉट क्र. ४५, डोबीनगर, वडधामणा येथे राहणारे फिर्यादी हितेश हेमराजजी भेंडे वय ४५ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह भावाचे घरी नंदनवन येथे वडीलांना भेटण्यास मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती २,८५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सतिश मेश्राम यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे यशोधरानगर :— गंभीर अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०५.०८.२०२६ चे २३.५० वा. चे सुमारास, फिर्यादीचे चुलत भाऊ नामे विद्यासागर रामनिरंजन पांडे, वय २६ वर्षे, रा. बालाजी नगर, कळमना नाका नं. ०४, जुना कामठी रोड, नागपूर हे त्यांचे दुचाकी मोपेड क्र. एमएच ४९ सीजी ४६७९ ने पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत, राणी दुर्गावती चौक ते ईतवारीकडे जाणाऱ्या रोडवरून जात असता, ट्रक क्र. एम.एच.०४ एचई ३५३१ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे भावाचे मोपेडला धडक मारून त्यांना गंभीर दुखापत करून पळुन गेला. गंभीर जखमी यांना उपचाराकरीता मॅक्स हॉस्पीटल येथे दाखल केले आहे. उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी आनंदसागर विद्यार्थी पांडे, वय २८ वर्षे, रा. बालाजी नगर, कळमना नाका नं. ०४, जुना कामठी रोड, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. सुरेश बुंदे

८९९९६९४०१३ यांनी आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१, १२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १८४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सदर :—** दिनांक ०६.०८.२०२६ चे १४.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सदर हद्दीत, रेसीडेंन्सी रोड ते अशोका हॉटेल चौक दरम्यान पेट्रोल पंपसमोर, ओव्हर ब्रिज खाली, डिव्हायडरचे मध्ये एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन—बांधा— सडपातळ, अंगात निळ्या रंगाचे हाफ टि—शर्ट व राखडी रंगाचा लोअरपॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे सदर येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. उमेश तायडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** कु. प्रियंका विशाल पोटनाके, वय २१ वर्षे, रा. रामबाग, जयंती मैदानसमोर, ईमामवाडा, नागपूर ही दिनांक ०६.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— सलवार सूट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे पाचपावली :—** कु. सदक परविन अली वल्द कादीर अली, वय २३ वर्षे, रा. आशिनगर, पाचपावली, नागपूर ही दिनांक २७.०७.२०२६ चे १४.०० वा. पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाची कुर्ती व काळ्या रंगाचा जिन्स घातलेले आहे. भाषा— हिंदी बोलते.

**३) पोलीस ठाणे बेलतरोडी :—** सौ. शकीना रमेश सोनवणे, वय २१ वर्षे, रा. कौस्तुभ किराणाजवळ, श्यामनगर, बेलतरोडी नागपूर ह्या दिनांक १९.०७.२०२६ चे १७.०० वा. पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची— ५ फुट २ इंच, केस— काळे लांब, अंगात— पांढऱ्या रंगाचा फ्रॉक घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**४) पोलीस ठाणे जरीपटका :—** निलेश संजय बागडे, वय ३१ वर्षे, रा. प्लॉट नं. १५८२, भंडार मोहल्ला,, इंदोरा, जरीपटका, नागपूर हे दिनांक ०४.०८.२०२६ चे २२.३० वा. पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे, अंगात— स्काय ब्ल्यु रंगाची टि—शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**५) पोलीस ठाणे ईमामवाडा :—** कु. कशीश ओमप्राकश नक्के, वय २२ वर्षे, रा. सिरसपंठ, माता मंदीरजवळ, उमरेड रोड, ईमामवाडा नागपूर ही दिनांक २७.०७.२०२६ रोजी पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— गोल, बांधा— मध्यम, उंची—४ फुट ६ इंच, केस— काळे लांब, अंगात— टि—शर्ट व क्रिम रंगाचा प्रिंटेड लोअर घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

    

प्रियंका        सदक        शकीना        निलेश        कशीश

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४३१९ /२००६ | कलम ४९२, ३४ भादंवि ४, २५ भा.ह.का. | १)शमीन उर्फ शम्मु अहमद, वय २१ वर्षे रा. लोधीपूरा, जाफर रेस्टॉरेंट जवळ, नागपूर. २)अनिल भगवान मालेवार, रा. सिरसपेठ, तेलीपूरा, नागपूर | १०.०८.२०२६ |
| **२.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ६२, मुंबई | ६२०४२२१/२०१९ | कलम ५००, ३४ भादंवि | पवन साहेबराव वानखेडे, रा. जैन हाऊस, झिरो माईल जवळ, नागपूर | १९.०८.२०२६ |
| **३.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, कामठी कोर्ट | ३२०/२०१८ | कलम ३७९, १२० भादंवि | शेख सिकंदर शेख सुलतान, रा. भाजी मंडी, पापाच्या बगीच्या जवळ, कामठी | ११.०८.२०२६ |
| **४.** | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३१२७२८ /२००६ | कलम २७९, ३३७, ३०४ अ भादंवि | दिलीप जे पिल्लेवान, वय १९ वर्षे, रा. गरोबा मैदान बुध्द विहार नागपूर | १०.०८.२०२६ |
| **५.** | मा. १५वे सहदिवाणी न्यायाधीश क–स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०१८०१ /२०१२ | कलम ३७९ भादंवि | आशीफ शेख अब्दुल ताज शेख, रा. हसनबाग, नाल्याजवळ, खरबी रोड, नंदनवन, नागपूर | १३.०८.२०२६ |
| **६.** | मा. जिल्हा न्यायाधिश ८ तथा अति. सत्र न्यायाधिश, नागपूर | १०००४० /२०१२ | कलम ३०२ भादंवि | भिम व्हि. मुळे, रा. चिरकुट शेडें, यांचे घरी किरायाने खैरी, नागपुर | १४.०८.२०२६ |

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**